**ठळक बातम्या**

- अर्थव्यवस्थेच्या आकाराच्या बाबतीत महाराष्ट्राची स्पर्धा आता जागतिक स्तरावर असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन, नागरी सेवा दिनानिमित्त राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान आणि स्पर्धेचं पारितोषिक वितरण

- महिला आरक्षण आणि सीमांकन विधेयकावरुन रालोआ आणि विरोधकांचे आरोप प्रत्यारोप

- बारामती आणि राहुरी विधानसभा मतदार संघांमधल्या पोटनिवडणुकीचा प्रचार संपला

- भाजपाचे ज्येष्ठ नेते, माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांचं निधन

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ७५३ अंकांची वाढ

**<><><><><><>**

अर्थव्यवस्थेच्या आकाराचा विचार करता महाराष्ट्राची स्पर्धा आता देशातल्या अन्य राज्यांशी नसून जागतिक स्तरावर असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. नागरी सेवा दिनानिमित्त आज मुंबईत आयोजित कार्यक्रम झाला. त्यावेळी ते बोलत होते.

महाराष्ट्र आता जगातली तिसावी मोठी अर्थव्यवस्था असल्याचं  त्यांनी सांगितलं. अर्थव्यवस्थेच्या विकासाची हीच गती कायम राखली तर आपण पुढच्या दोन ते तीन वर्षामध्ये यूएई आणि सिंगापूरला देखील अर्थव्यवस्थेच्या आकारात मागे टाकू शकतो, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**- - होल्ड बाईट मुख्यमंत्री - - -**

यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान आणि स्पर्धेची पारितोषिकं प्रदान करण्यात आली.

ड्रोन आधारित देखरेख - डिजिटल डेटा मेंटेन्सस प्रणालीसाठी कृषी तसंच पशुधन दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय विकास विभागाला प्रथम क्रमांकांचा दहा लाखांचा तर कार्यालयीन कामकाजातील सुधारणेसाठी मराठी भाषा विभागाला सहा लाख रूपयांचा दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे.

मत्स्यसंपदेच्या संरक्षण संवर्धन प्रकल्पासाठी मत्स्यव्यवसाय आयुक्त मुंबई यांना प्रथम क्रमांकांचा विभागीय, तर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला प्रगत तंत्रज्ञानाच्या वापरासाठी दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार देण्यात आला. विभागीय स्तरावर तळोदा इथल्या आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी यांना प्रथम क्रमांकाचा, जळगाव जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दुसऱ्या क्रमांकाचा, तर वाशिम कृषी विकास अधिकारी यांना तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे.

महापालिका गटात अमरावतीला 'कूल रूफ' संकल्पनेसाठी, छत्रपती संभाजीनगर स्मार्ट सिटी कार्पोरेशनला व्हाॅटस अप आणि चॅटबाॅटद्वारे सेवांसाठी, तर मीरा भाईंदर महापालिकेला ई- गर्व्हनन्साठी अनुक्रमे पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाचं पारितोषिक मिळालं.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनीही या नागरी सेवा दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

देशभरात आज नागरी सेवा दिवस साजरा केला जात आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी  यांनी या दिवसानिमित्त सर्व सनदी अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रीय हितासाठी सर्व राजकीय पक्षांनी महिला आरक्षण विधेयकाशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयकाला पाठिंबा द्यायला हवा होता, मात्र विरोधी पक्षांनी राष्ट्रीय हितापेक्षा पक्षीय राजकारणाला प्राधान्य दिल्यानं हे विधेयक मंजूर होऊ शकलं नाही, अशी टीका केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांनी केली आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. या विधेयकाला विरोध केल्यामुळे विरोधी पक्षांना भविष्यात गंभीर परिणामांना सामोरं जावं लागू शकतं, असंही वीरेंद्र कुमार यावेळी म्हणाले….

**होल्ड.. बाईट - वीरेंद्र कुमार**

महिला आरक्षणासाठीच्या घटनादुरूस्ती विधेयकाला विरोध करून विरोधी पक्षांनी महिलांना समान संधी नाकारली असून, देशातल्या महिला, त्यांना कधीही माफ करणार नाहीत असं पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी म्हटलं आहे. त्या आज ठाण्यात वार्ताहर परिषदेत बोलत होत्या.

**<><><><><><>**

महिलांना संसद आणि विधिमंडळात ३३ टक्के आरक्षण तातडीनं लागू करावं अशी मागणी काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी केली आहे. महिला आरक्षण विधेयक २०२३ मधे संसदेत मंजूर झालं, त्याची अंमलबजावणी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत झाली असती, तर आज लोकसभेत १८० महिला खासदार असत्या असं त्या म्हणाल्या. सरकार महिला आरक्षण विधेयकाची अंमलबजावणी न करता याचा वापर केवळ ढालीसारखा करत आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

महिला आरक्षण विधेयकाच्या आडून, सीमांकन विधेयक आणण्यात संसदेच्या जागा अशास्त्रीय पद्धतीनं वाढवण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न होता, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरद्‌चंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. ते आज पुण्यात वार्ताहर परिषदेत बोलत होते. हा प्रयत्न विरोधकांनी उधळून लावला, आणि सरकारला मतदानात पराभूत व्हावं लागलं, असं ते म्हणाले.

<><><><><><>

बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठीचा प्रचार आज संपला. बारामती पोटनिवडणुकीत सर्व पक्षांनी दिलेला पाठिंबा हा बारामतीच्या भवितव्याबद्दलची एकत्रित बांधिलकी असल्याचं प्रतिपादन, राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी आज केलं. विधानसभा पोटनिवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी संपताना घेतलेल्या सांगता सभेत त्या बोलत होत्या. पाठिंबा देणाऱ्या सर्वांचे त्यांनी आभार मानले.

प्रकृती अस्वास्थ्यामुळे आपण मुंबईबाहेर जाऊ शकत नसून नाईलाजास्तव मतदानाचा हक्क बजावता येणार नाही, असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आपल्या निवेदनात म्हटलं आहे. या निवडणुकीत सुनेत्रा पवार यांना आपल्या पक्षाने दिलेला पाठिंबा ही अजित पवार यांना श्रद्धांजली असल्याचं शरद पवार म्हणाले.

दरम्यान, राहुरीमध्ये भाजपकडून अक्षय शिवाजी कर्डिले, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून गोविंद मोकाटे, वंचित बहुजन आघाडी कडून संतोष एकनाथ चोळके यांच्यासह एकूण ७ उमेदवार रिंगणात आहेत.

<><><><><><>

भाजपाचे ज्येष्ठ नेते, माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांचं आज लातूर इथं वार्धक्यानं निधन झालं. ते ९४ वर्षांचे होते. डॉ. गोपाळराव पाटील यांनी वैद्यकीय सेवेतून समाजकारणात प्रवेश करून राजकारणात सक्रीय भूमिका बजावली. १९९४ ते २००० या काळात भाजपाचे राज्यसभा सदस्य म्हणून त्यांनी काम केलं. तसंच वाणिज्य, परराष्ट्र व्यवहार, रेल्वे यासारख्या महत्त्वाच्या संसदीय विषय समित्यांमध्ये योगदान दिलं.

शिक्षण, वैद्यकीय सेवा आणि समाजकार्य या क्षेत्रांत त्यांनी भरीव योगदान दिलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, तसंच लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><><>**

अमेरिका आणि इराणमध्ये चर्चा पुन्हा सुरू होण्याच्या शक्यतेनं देशातले शेअर बाजार आज दीड महिन्यातल्या उच्चांकी पातळीवर बंद झाले. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ७५३ अंकांची वाढ नोंदवून ७९ हजार २७३ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २१२ अंकांची तेजी नोंदवून २४ हजार ५७७ अंकांवर स्थिरावला. सुरुवातीला किरकोळ वधारलेले हे दोन्ही निर्देशांक संपूर्ण सत्रात टप्प्याटप्प्याने वधारत गेले. तेलाच्या कमी झालेल्या किंमतीचाही फायदा शेअर बाजारांना झाला.

**<><><><><><>**

पालघर जिल्ह्यात कोणसई गावातल्या फटाके बनवणाऱ्या कंपनीत आज दुपारी बाराच्या सुमारास स्फोट झाला. या स्फोटात दोन कामगारांचा मृत्यू झाला तर चार जण जखमी झाले. जखमींवर वाडा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहे.

**<><><><><><>**

उष्णता प्रतिसादक्षम आणि शाश्वत शीतकरणासाठी नागपूर इथं आज सेंटर फॉर एक्सलन्स सुरू करण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस या कार्यक्रमाला दूरस्थ पद्धतीनं उपस्थित होते. अतिउष्णतेच्या संकटाचा सामना करण्यासाठी हे केंद्र सुरू केलं असून भविष्यात हे केंद्र आपत्ती व्यवस्थापन संस्थेचा भाग म्हणून कार्यरत राहील असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

उष्णलाट कृती आराखड्यासाठी सक्षम योजना तयार करणं, वार्षिक अंमलबजावणीवर भर देणं, त्यासाठी अधिकारी, आरोग्य कर्मचारी, स्थानिक शहरी नागरिकांसाठी प्रशिक्षण आराखडा तयार करणं आदी कामं ही संस्था करणार आहेत.

**<><><><><><>**

देवस्थानांच्या इनाम जमिनींचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी विधिमंडळाच्या आगामी अधिवेशनात कायदा करणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण तालुक्यातल्या ऐतिहासिक पेढे परशुराम देवस्थानच्या इनामी जमिनींविषयी आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

<><><><><><>

आषाढी वारीसाठी पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना आणि स्थानिक नागरिकांना पायाभूत सुविधा मिळाव्यात यासाठी पंढरपूर विकास आराखड्याच्या कामांना गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिले आहेत. आषाढी वारीच्या पालखी मार्गांवरच्या सुविधांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते.

<><><><><><>

आयपीएल क्रिकेटमध्ये आज सनरायझर्स हैदराबादचा सामना दिल्ली कॅपिटल्स बरोबर होणार आहे. थोड्याच वेळात म्हणजे संध्याकाळी साडे-सात वाजता हैदराबाद इथल्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर हा सामना होईल.

दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम  क्षेत्ररक्षण  करायचा निर्णय घेतला आहे. काल मुंबई इंडियन्सने गुजरात टायटन्सचा ९९ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने २० षटकांत पाच गडी गमावून १९९ धावा केल्या. तिलक वर्माला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं.

<><><><><><>

संपावर गेलेल्या राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक पातळीवर चर्चा सुरू आहे. मात्र काही आव्हानांमुळे निर्णयासाठी वेळ लागेल, असं

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज सांगितलं. नागपूर इथं ते बातमीदारांशी बोलत होते.

बावनकुळे यांनी यावेळी महसूल खात्याच्या निर्णयांची माहिती दिली.

<><><><><><>

नवीन आयकर कायद्याविषयी जनजागृती करण्यासाठी आयकर विभागानं आज नवी मुंबईत विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. मुख्य आयकर आयुक्त विक्रम सहाय यांनी यावेळी नवीन आयकर कायद्याविषयी मार्गदर्शन केलं आणि उपस्थितांच्या शंकांचं निरसन केलं.

<><><><><><>

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पुढचे दोन ते तीन दिवस मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा आणि पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

//<><><><><><>//